मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# महापालिकेकडून पहिल्या तिमाही पाणीपट्टीची वसुली

## पहिल्या तिमाहीत 15 कोटींची पाणीपट्टी वसूल : गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा 45 लाखांनी अधिक पाणीपट्टी वसूल

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने मागील वर्षापासून मालमत्ता करासोबतच पाणीपट्टीची वसुली करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय महसूल वाढीच्या दृष्टीने फायदेशीर ठरला असून, २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत १५ कोटी ५३ लाख ११ हजार ७३० रुपयांची पाणीपट्टी महापालिकेने वसूल केली आहे.



शहरातील निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक अशा मिळून सुमारे १ लाख ८० हजार ९०६ नळजोडधारक असून, त्यांच्याकडून विविध माध्यमांतून पाणीपट्टी भरली जात आहे. कर संकलन विभागाच्या नियोजनबद्ध कार्यपद्धतीमुळे ही वसुली अधिक प्रभावीपणे पार पडली. दरम्यान, शहरात अजूनही सुमारे ३२ हजार ४६० नळधारकांकडून पाणीपट्टी थकलेली आहे. "थकबाकीदारांनी लवकरात लवकर पाणीपट्टी भरावी, अन्यथा नळ कनेक्शन खंडीत करण्याची कारवाई करण्यात येईल," असा इशारा महापालिकेने दिला आहे.

कर संकलन विभागाच्या प्रयत्नांमुळे हा उपक्रम यशस्वी होताना दिसत आहे. नागरिकांनी देखील वेळेत पाणीपट्टी भरून महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

पाणीपुरवठा विभागामार्फत पाणीपट्टी ग्राहकांना लवकरच नादुरुस्त अथवा बंद असलेले पाणीपट्टी मीटर दुरुस्त करण्याबाबत नोटीस देण्यात येणार आहे. सध्या अनेक ठिकाणी पाणीपट्टी मीटर नादुरुस्त असल्याने रिडिंग घेणे शक्य होत नाही. त्यामुळे बिलात अडचणी निर्माण होत आहेत. यासाठी नागरिकांनी स्वतःहून पुढाकार घेऊन पाणीपट्टी मीटर लवकरात लवकर दुरुस्त करावेत, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

### तिमाहीत जमा झालेल्या रकमेचे माध्यमनिहाय तपशील

- धनादेशाद्वारे: ₹५ कोटी ९० लाख ९८ हजार ५८५
- रोख स्वरूपात: ₹३ कोटी ९ लाख ७ हजार ९८६
- ऑनलाइन भरणा: ₹६ कोटी ५३ लाख ५ हजार १५९
- एकूण: ₹१५ कोटी ५३ लाख ११ हजार ७३०

"मालमत्ता करासोबत पाणीपट्टी वसूल करण्याचा निर्णय महसूल वाढीच्या दृष्टिकोनातून योग्य आहे, हे पुन्हा सिद्ध झाले आहे. ही फक्त आकडेवारी नाही तर महापालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या कामाची पावती आहे. नागरिकांनी वेळेत कर भरून महापालिकेस सहकार्य करावे, अन्यथा थकबाकीदारांवर कटू कारवाई करण्याशिवाय पर्याय उरणार नाही. यामुळे शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थापन अधिक शिस्तबद्ध होईल.

- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

"पाणीपट्टी वसुलीची ही यशस्वी आकडेवारी ही संपूर्ण कर संकलन विभाग आणि पाणीपुरवठा विभागाच्या कामाचे फलित आहे. आम्ही डिजिटल पेमेंट सुविधा उपलब्ध करून नागरिकांना सुलभ सेवा देण्याचा प्रयत्न केला. नागरिकांचा प्रतिसाद समाधानकारक आहे.

- अविनाश शिंदे, सहायक आयुक्त, महानगरपालिका

---

# ऑनलाईन बुकिंग रद्द करा : भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी मागणी

## निळू फुले नाट्यगृह ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया ठरत आहे गैरसोयीची, या संदर्भात पालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपळे गुरव येथील नटसम्राट निळू फुले नाट्यगृह हे पिंपरी चिंचवड महापालिकेचे एक प्रमुख नाट्यगृह आहे. हे शहरातील एक अत्यंत महत्त्वाचे सांस्कृतिक केंद्र आहे. येथे स्थानिक कलाकार व संस्थांना संधी मिळत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे या नाट्यगृहासाठी सुरु असलेले ऑनलाईन बुकिंग रद्द करावे, अशी मागणी भाजप शहराध्यक्ष शत्रूघ्न काटे यांनी केली आहे.



या संदर्भात काटे यांनी पालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, निळू फुले नाट्यगृह अनेक नाट्यप्रयोग,संगीत मैफिली, शालेय व महाविद्यालयीन कार्यक्रम सातत्याने पार पडतात.

अनेक कलाकार, संस्था अजूनही डिजिटल प्रणालीत पारंगत नाहीत. त्यांना स्थानिक कार्यालयात प्रत्यक्ष भेटीने नोंदणी करणे त्यांना अधिक सोयीचे वाटते. त्यामुळे स्थानिक कलाकारांना नाट्यगृह उपलब्ध होत नाही. नाट्यगृहासाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया महापालिकेने सुरू केली आहे. परंतु, गेल्या काही काळात या नाट्यगृहासाठी सुरू करण्यात आलेली ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया अनेक अडचणी व गैरसोयींचे कारण बनली आहे. अर्जदार नाट्यगृहाच्या वेबसाइटवर जाऊन कार्यक्रमासाठी तारीख, वेळ आणि इतर माहिती भरून नोंदणी करतो. या प्रक्रियेमुळे काही त्रुटी समोर आल्या आहेत.

### कलाकार अजूनही डिजिटल साक्षर नाहीत

» अनेक कलाकार, संस्था अजूनही डिजिटल प्रणालीत पारंगत नाहीत. त्यांना स्थानिक कार्यालयात प्रत्यक्ष भेटीने नोंदणी करणे त्यांना अधिक सोयीचे वाटते. त्यामुळे स्थानिक कलाकारांना नाट्यगृह उपलब्ध होत नाही. त्यामुळे ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया तात्पुरती स्थगित करावी व कार्यालयीन नोंदणी पद्धती पुन्हा सुरू करावी. एका संस्थेला ठराविक मर्यादेपेक्षा अधिक वेळा आरक्षण करण्यास बंदी घालावी, अशी मागणी या पत्राव्दारे काटे यांनी केली आहे.

# पुणे महापालिका शोधणार लाखभर मिळकती

## शहरात सद्य:स्थितीत तीन ते चार लाख मिळकतींची अद्यापही करआकारणी झाली नसल्याचे समोर...

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या मिळकतकर विभागाने पहिल्या सव्वादोन महिन्यांत तीन हजार २५० कोटींच्या उद्दिष्टापैकी १४०० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळविण्यामध्ये यश मिळविले आहे. मात्र असे असले, तरी उर्वरित उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी कोणते प्रयत्न केले पाहिजेत, याचा अभ्यास मिळकतकर विभागाने सुरू केला आहे.

शहरात सद्य:स्थितीत तीन ते चार लाख मिळकतींना महापालिकेकडून कर लावण्यात आलेला नसला, तरी त्यांचा वापर मात्र सुरू आहे. त्यामुळे या मिळकतींचा शोध घेऊन त्यांच्याकडून मिळकतकर घेण्याचे नियोजन सुरू करण्यात आले आहे.

महापालिकेच्या हद्दीत दर वर्षी मोठ्या प्रमाणात बांधकामे होतात. त्यांची पाहणी करून मिळकतकर लावला जातो. दर वर्षी शहराचा विस्तार होत असल्याने मिळकतींची संख्यादेखील वाढली आहे. मात्र, तीन ते चार लाख मिळकतींची अद्यापही करआकारणी झाली नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या मिळकती शोधून त्यांना करआकारणी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. आठ महिन्यांमध्ये किमान एक लाख मिळकती शोधून करआकारणी करण्याचे उद्दिष्ट मिळकतकर विभागाच्या २८ विभागीय निरीक्षकांना देण्यात आले आहे.

महापालिकेच्या मिळकतकर विभागाकडून शहरातील निवासी, व्यावसायिक मिळकती, औद्योगिक, तसेच मोकळ्या जागांवर करआकारणी केली जाते. मिळकत बांधून पूर्ण झाल्यानंतर महापालिकेच्या बांधकाम विभागाने त्याचे भोगवटा पत्र दिलेल्या दिवसापासून त्यावर करआकारणी केली जाते. काही नागरिक अनधिकृत बांधकामे करतात. बांधकाम केल्यानंतर महापालिकेकडून भोगवटा पत्र घेतात. मात्र, त्यानंतरही मिळकतकराची आकारणी करून घेत नाहीत. अशा मिळकतींचा शोध घेऊन मिळकतकर विभाग त्यांच्याकडून मिळकतकर वसूल करते. यासाठी नागरिक स्वत: अर्ज करूनदेखील कर निश्चित करून घेऊ शकतात.




### करनिरीक्षकांना आदेश

» महापालिकेच्या मिळकतकर विभागाला गेल्या वर्षी २६०० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले होते. शहराचा वाढत असलेला विस्तार, जुने वाडे, इमारतींचा केला जाणारा पुनर्विकास यामुळे बांधकामांचे प्रकल्प वाढत आहेत. त्यामुळे महापालिका आयुक्तांनी यंदा २०२५-२६ मध्ये मिळकतकर विभागाला ३२५० कोटी रुपयांचे उद्दिष्ट दिले आहे. महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३२ गावांतील मिळकतकराच्या वसुलीचा प्रश्न प्रलंबित आहे. त्याचा फटका उद्दिष्ट गाठताना बसणार आहे. त्यामुळे वापर सुरू असलेल्या आणि करआकारणी न झालेल्या मिळकतींचा शोध घेण्यास महापालिकेने सुरुवात केली आहे.

### गेल्या तीन वर्षांचे हे आहे चित्र

| » वर्षे – | नव्याने आकारणी झालेल्या मिळकती |
|---|---|
| » २०२२-२३ – | ५४ हजार ५७४ |
| » २०२३-२४ – | ५२ हजार ६३३ |
| » २०२४-२५ – | ४० हजार १५३ |

> मिळकतकर विभागाने पहिल्या सव्वादोन महिन्यांत १४०० कोटी रुपयांचा महसूल गोळा करण्यात यश मिळविले आहे. समाविष्ट गावांतील मिळकतकराला दिलेली स्थगिती उठवावी, यासाठी राज्य सरकारकडे पाठपुरावा सुरू आहे. मिळकतकर विभागाच्या निरीक्षकांना शहरात सुरू असलेली बांधकामे, वापरातील बदल, कर आकारणीसाठी आलेल्या अर्जावर विशेष लक्ष केंद्रित करून उत्पन्नवाढीसाठी एक लाख मिळकती शोधण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.
>
> - अविनाश सपकाळ, उपायुक्त, मिळकतकर विभाग, पुणे

# केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांचे सहकाराबद्दल विशेष प्रयत्न, राज्यात सात हजार विकास सोसायट्या

## सहकार शताब्दी वर्षानिमित्त आणि राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेच्या (नाबार्ड) 44 व्या स्थापना दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**पुणे | प्रतिनिधी**

'सहकाराची जननी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्रातील अनेक गावांत विकास सोसायट्या, संस्था नाहीत. अशा गावांमध्ये वर्षभरात सात हजार 'प्राथमिक सहकारी कृषी पतसंस्था' (पीएसीएस) अर्थात विकास सोसायट्यांची स्थापना करण्यात येईल,' अशी घोषणा केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी शनिवारी पुण्यात केली.

'अडचणीत असलेल्या, प्रशासक नेमलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, सोसायट्यांना राज्य सहकारी बँका आणि नाबार्डकडून अर्थसाहाय्य देण्यास सुरुवात केली असून, सहकारी चळवळ आणखी सक्षम आणि ताकदवान करण्यात येत आहे,' असेही ते म्हणाले.

सहकार शताब्दी वर्षानिमित्त आणि राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेच्या (नाबार्ड) ४४ व्या स्थापना दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यशदा येथे झालेल्या कार्यक्रमाला 'नॅफस्कोब'चे अध्यक्ष के. रवींद्र राव, 'राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळा'चे महाव्यवस्थापक व्ही. श्रीधर, राज्य सरकारच्या सहकार विभागाचे सचिव प्रवीण दराडे, सहकार आयुक्त दीपक तावरे, 'नाबार्ड'चे उपव्यवस्थापकीय संचालक जी. एस. रावत, 'नाबार्ड'च्या महाराष्ट्र विभागीय कार्यालयाच्या महाव्यवस्थापक रश्मी दराड आदी उपस्थित होते. या वेळी राज्यातील बहुउद्देशीय कृषी सहकारी संस्था (एमपीएसीएस) आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना (डीसीसीबी) गौरविण्यात आले. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचाही गौरव करण्यात आला.

मोहोळ म्हणाले, 'देशाच्या अर्थव्यवस्थेत सहकारी क्षेत्राचा मोठा वाटा आहे. विशेषत: देशातील महाराष्ट्र, गुजरात आणि कर्नाटक या राज्यांमध्ये सर्वाधिक सहकारी संस्था आहेत. या सहकार क्षेत्राचा पाया ग्रामीण व्यवस्थेवर अवलंबून असून, देशातील आठ लाखांहून अधिक सहकारी संस्थांपैकी महाराष्ट्रात सव्वा दोन लाख विविध सहकारी संस्था आहेत.



### कारभाराचे संगणकीकरण

» सहकार क्षेत्राच्या उन्नतीसाठी पक्ष, विचार, राजकारण याच्या पलीकडे जाऊन सहकार्य करण्यात येत आहे. अडचणीत आलेल्या जिल्हा मध्यवर्ती बँका, सोसायट्या, पतसंस्थांची आर्थिक पडताळणी करून निकषाद्वारे राज्य सहकारी बँकांकडून अर्थसाहाय्य देण्यास सुरुवात केली आहे. सहकार क्षेत्रातील विश्वासार्हता टिकवून पारदर्शक कारभार निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. त्यानुसार आजमितीस देशातील ६८ हजार सहकारी संस्थांचा कारभार संगणकीकृत झाला आहे,' असेही मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले.

### 'ग्रामीण भागातील कुटुंबेही सक्षम होणार'

» 'देशाची अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांनी विशेष प्रयत्न सुरू केले आहेत. सेवा विकास सोसायट्या पूर्वी केवळ कर्ज देण्याचे काम करीत होत्या. त्यामुळे अनेक सोसायट्या बंद पडल्या. सोसायट्यांना सक्षम करण्यासाठी २५ वेगवेगळे व्यवसाय देण्यात आले आहेत. या सोसायट्यांकडून ग्रामीण भागात पेट्रोल पंप, गॅस एजन्सी अशा सेवा देण्यात येत आहेत. दूध संघ, मत्स्यपालन व्यवसायालाही सोसायटीचा दर्जा देण्यात येणार असल्याने या सोसायट्यांसह ग्रामीण भागातील कुटुंबेही सक्षम होणार आहेत,' असे मुरलीधर मोहोळ यांनी नमूद केले.

# कोट्यवधींचा कररुपी पैसा ठेकेदाराच्या घशात

## पिंपळे गुरव येथील सृष्टी चौक ते शंकरवाडी रस्ता दहा महिन्यांचा अल्पकाळातच निकृष्ट कामामुळे उखडला

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपळे गुरव येथील सृष्टी चौक ते शंकरवाडी पर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्ता महापालिकेच्या स्थापत्य विभागाकडून करण्यात येत आहे. मात्र, या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून वर्षातून दोन वेळा रस्त्याची दुरुस्ती करण्यात आलेली आहे. या रस्त्याचे दोन भाग तयार झाले होते. अनेक ठिकाणी रस्त्यावर भेगा पडून रस्ता उखडला गेला होता. या रस्त्यावर महापालिकेकडून २३ कोटी रुपये खर्च करुनही रस्त्याचे काम पुर्ण झालेले नाही. त्यामुळे रस्त्याच्या कामाची चौकशी करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकातून केली जात आहे.

पिंपळे गुरव येथून कासारवाडी मार्गे पुढे जूना पुणे-मुंबई महामार्गावर वाहतूक सुरळीत व्हावी, नागरिकांना वाहतूक कोंडी न पर्यायी मार्ग उपलब्ध असावा म्हणून या रस्त्याचे काम हाती घेतले होते. यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने शंकरवाडी ते कासारवाडी काँक्रिटचा रस्ता केला.



### एक भेग दुरुस्त करण्यासाठी उखडला रस्ता

» गेल्या चार दिवसांपूर्वी रस्त्याला पडलेली भेग दुरुस्त करण्यासाठी महापालिकेने रस्ता उखडला होता. त्याठिकाणी काँक्रिट भरुन रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली. त्यासाठी दहा ते वीस मीटर अंतरावरुन बॅरिकेड लावून रस्ता बंद करण्यात आला होता. त्यामुळे पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, कासारवाडी भागातून जाणा-या वाहतुकीला अडथळा निर्माण झाला.

वाहतुकीसाठी हा रस्ता सुरु केल्यापासून गेल्या वर्षभरात दोन वेळा रस्ता दुरुस्तीसाठी उखडण्यात आला. मागील महिन्यात रस्त्याला पडलेली दहा मीटरची भेग (क्रॅक) दुरुस्त केल्यानंतर काही दिवसांतच पुन्हा रस्त्याला एक ते दीड इंच रुंद आणि दहा मीटर लांबीची भेग पडली. ती दुरुस्त करण्यासाठी ठेकेदाराने चार दिवसांपूर्वी रस्ता उखडला होता. करोडो रुपये खर्च करुनही रस्त्याचे काम निकृष्ट होत असल्याचा स्थानिक नागरिकांकडून आरोप होत आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थापत्य विभागाने सार्वजनिक वाहतुकीला पिंपळे गुरव मार्गे कासारवाडी आणि पुढे शंकरवाडी मार्गे पुणे-मुंबई महामार्गावर जाता यावे, यासाठी सर्वेनंबर ५०२ ते सर्वेनंबर ४९६ पर्यंत शंकर मंदिर ते पिंपळे गुरव पुलापर्यंत काँक्रिटचा डीपी रस्ता तयार केला.

मात्र, शंकर मंदिर ते कासारवाडीच्या भारतरत्न जे. आर. डी. टाटा उड्डाण पुलापर्यंत सिमेंट काँक्रीट रस्त्यावर अक्षरशः भेगा पडत आहेत. दहा महिन्यापूर्वी हा रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. मात्र, काही दिवसांतच शंकरवाडी येथील घनकचरा स्थानांतर केंद्रासमोर रस्त्याला दोन इंचाची दहा मीटर लांब भेग पडली होती.

दोन्ही बाजुंनी रस्ता बंद करुन दुरुस्ती काम करण्यात आले. याला महिनाभराचा कालावधी उलटला नाही, तोवर पुन्हा याच ठिकाणी एक ते दीड इंचाची दहा ते पंधरा मीटर लांब भली मोठी भेग पडली. ती दुरुस्त करण्यासाठी पुन्हा रस्ता उखडण्यात आला. रस्त्यावर बॅरिकेड लावून भेग पडलेला पॅच उखडून त्याची काँक्रिट भरुन दुरुस्ती करण्यात आली. त्यामुळे महापालिकेच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

### करोडोंचा खर्च तरीही रस्त्याला भेगा

» या सिमेंट रस्त्यावर तब्बल २३ कोटी ३९ लाख एवढा खर्च करण्यात आला. तरी, रस्त्याला ठिकठिकाणी भेगा पडू लागल्या आहेत. यावरुन निकृष्ट दर्जाचा रस्ता केल्याचे स्पष्ट होत आहे. स्थानिक आमदार, माजी नगरसेवक यावर कोणीच याबाबत बोलत नसल्याने सर्वांचीच मिलिभगत असल्याचे यावरून स्पष्ट होत आहे. या रस्त्याला पर्यायी जोड रस्ते असल्यामुळे उपनगराला जोडणारा हा रस्ता असला तरी या रस्त्याचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात नाही. या रस्त्यासाठी करोडो रुपयांचा खर्च केला, तरी सुध्दा रस्त्याला भेगा पडू लागल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

> “सिमेंट काँक्रीटच्या रस्त्याला भेगा पडल्या होत्या. रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराचा देखभाल दुरुस्ती कालावधी पाच वर्षांचा आहे. त्यामुळे रस्त्याची दुरुस्ती करुन देणे ठेकेदाराला बंधनकारक आहे. त्यानुसार रस्त्याची दुरुस्ती करुन घेण्यात आली.
>
> - सुनिल दांगडे, उपअभियंता, महापालिका

# पुणे जिल्ह्यातील रिंगरोडसाठी समन्वयाने राबवणार भूसंपादन प्रक्रिया

## रिंग रोडमध्ये शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही; आयुक्तांकडून बाधित शेतकऱ्यांना मोबदला देण्याचे आश्वासन

**पुणे | प्रतिनिधी**

पीएमआरडीएकडून पुणे जिल्ह्यातील रिंगरोडसाठी लागणाऱ्या भूसंपादन प्रक्रियेसाठी बाधित शेतकऱ्यांशी संवाद साधण्यात आला. त्यांच्याशी समन्वय ठेवून भूसंपादन प्रक्रिया राबवण्यात येईल. शेतकऱ्याचे नुकसान न करता त्याचा मोबदला देऊन भूसंपादन प्रक्रिया राबवली जाईल, असे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी स्पष्ट केले.

शेतकऱ्यांचे हक्क आणि अधिकारांचा प्रथम विचार करून भूसंपादन प्रक्रिया राबवली जाणार आहे. यात शेतकऱ्यांनी भूसंपादनास संमती दिली, तर त्यांना २५ टक्के अधिकचा मोबदला शासनाकडून मिळणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. या रिंगरोडमुळे बहुतांश गावे मुख्य रस्त्यांशी जोडली जाणार असल्याने दळणवळणाच्या अधिक सोयी - सुविधा उपलब्ध होतील. यासह भूसंपादन नंतर शेतकऱ्यांकडे शिल्लक राहणाऱ्या जमिनीचे महत्त्वदेखील पूर्वीपेक्षा अधिक वाढणार असल्याचे यावेळी भूसंपादन अधिकाऱ्यांनी सांगितले.

थेट खरेदी, संमतीने खरेदी, टीडीआर आणि इन्सेंटिव्ह एफएसआय आदीबाबत शेतकऱ्यांना यावेळी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. बैठकीत रिंग रोड टप्पा एक आणि टप्पा दोन यामध्ये बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांसोबत चर्चा करण्यात आली. यावेळी पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, मुख्य अभियंता रिनाज पठाण, भूसंपादन समन्वय अधिकारी कल्याण पांढरे, सह आयुक्त हिम्मत खराडे, अधीक्षक अभियंता प्रभाकर वसईकर, भूमिअभिलेख विभागाच्या अधीक्षक आशा जाधव आदी अधिकारी उपस्थित होते.



### शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन

» प्रस्तावित रिंगरोडमुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना भूसंपादनाची प्रक्रिया समजावी, या उद्देशाने बुधवारी पीएमआरडीए तर्फे संबंधित शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडीअडचणी समजून घेत त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. यासह भूसंपादन प्रक्रिया कशी राबवली जाते, याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

### या गावातील शेतकऱ्यांची उपस्थिती

» रिंगरोडसाठी भूसंपादन करण्यात येणाऱ्या वडगाव शिंदे, निरगुडी, आंबेगाव खुर्द, जांभळवाडी, भिलारेवाडी, मांगडेवाडी, गुजर निंबाळकरवाडी, येवलेवाडी, पिसोळी, वडाचीवाडी, कदमवाकवस्ती (ता. हवेली), सोळू (ता. खेड) या गावातील बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांशी संवाद साधण्यात आला.

# विमानतळ परिसरात स्वच्छतेसाठी आयुक्त मैदानात

## अधिकाऱ्यासह केली पाहणी : हडपसर रॅम्प आणि पुणे कॅन्टोन्मेंटच्या कचऱ्या बाबत सूचना

**पुणे | प्रतिनिधी**

विमानतळ परिसरातील कचऱ्याचा मुद्दा ऐरणीवर आलेला असून याभागातील भटक्या श्वानांमुळे विमानांच्या उड्डाण आणि खाली उतरण्याच्या प्रक्रियेत अनेकदा अडथळे येत आहेत. ही समस्याच एवढी वाढली होती की केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या दौऱ्यावेळी पालिकेला स्वतंत्र पथके श्वान पकडण्यासाठी तैनात करावी लागली होती. त्यानंतर, महापालिका आयुक्तांनी हा विषय गांभीर्याने घेत येथील स्वच्छतेला प्राधान्य दिले होते.

तसेच याठिकाणी अधिकाऱ्यांची नेमणूक देखील केली होती. विमानतळ प्राधिकरणाने पालिकेला कचरा समस्या असलेल्या ठिकाणांची यादी दिली होती. याठिकाणांवर स्वच्छता करण्यात आलेली असून याची पाहणी पालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी अधिकाऱ्यांसह केली. सर्व कामे समाधानकारकरित्या पूर्ण झालेली असून त्याबाबत महापालिका आयुक्त तसेच विमानतळ प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

खासदार तथा केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी यासंदर्भात बैठक घेऊन अधिकाऱ्यांना सूचना केल्या होत्या. त्या बैठकीच्या अनुषंगाने विमानतळ प्राधिकरण व महापालिकेच्या अधिकाऱ्यांची विविध विषयांवर एकत्र पाहणी शनिवार रोजी करण्यात आली. त्याचबरोबर हडपसर रॅम्प या ठिकाणी पालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी भेट दिली. त्यावेळी पालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप चंद्रन, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावस्कर, परिमंडळ एकचे उपायुक्त माधव जगताप, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त संदीप कदम, विमानतळ प्राधिकरणाचे प्रशांत ठोंबरे उपस्थित होते.

पाहणी दरम्यान आयुक्तांनी विमानतळालगतच्या परिसरामध्ये खाजगी मोकळ्या जागांवर असलेला कचरा व राडारोडा काढण्याच्या सूचना दिल्या. संबंधितांना सात दिवसाची नोटीस देऊन त्या जागा स्वच्छ करून घेण्यात यावा, असे त्यांनी सांगितले.



### कचऱ्याचे क्रॉनिक स्पॉट आढल्यास काम काढून घेण्यात येईल

» स्वच्छ संस्थेमार्फत बऱ्याच ठिकाणी नागरिकांनी पैसे न दिल्यामुळे कचरा स्वीकारला जात नाही. परंतु, नियमानुसार त्यांनी कोणाचाही कचरा नाकारायचा नाही. त्याचबरोबर जर त्यांच्याकडून संकलन होत असताना जर त्या भागामध्ये कचऱ्याचे क्रॉनिक स्पॉट आढळून आले तर, त्या भागातील त्यांना दिलेले काम काढून घेण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे. महापालिकेमार्फत त्या ठिकाणी दुसरी यंत्रणा कचरा संकलनासाठी नियुक्त केली जाईल. शहरातील कचरा संकलन केंद्रे यामध्ये हडपसर व इतर याचे मेकॅनाझेशन करणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

### विशेष पथकाची नियुक्ती

» वाघोली येथील भाजी मंडई त्याचबरोबर परिसरातील स्वच्छता करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात येणार असून तो परिसर तातडीने स्वच्छ करून नागरिकांकडून रस्त्यावर कचरा टाकला जाणार नाही, याबाबत प्रबोधन केले जाईल. दंडात्मक कारवाई देखील करण्यात येणार आहे. विमानतळाच्या परिसरामध्ये लोहगाव, खराडी, विमाननगर व इतर परिसरामध्ये कचरा संकलन व नागरिकांनी अस्वच्छता करू नये याबाबत सक्त निर्देश देण्यात आले आहेत. नागरिकांनी रस्त्यावर कचरा टाकल्यास त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येणार असून यासाठी विशेष पथकाची नियुक्ती करण्यात येणार आहे.

### तातडीने कारवाई करण्याच्या सूचना

» हडपसर येथील औद्योगिक वसाहतीमधील पुणे कॅन्टोन्मेंटचा कचरा उघड्यावर टाकला जातो. वर्षानुवर्षे त्या ठिकाणी पडलेला कचरा बायोमायनिंगद्वारे प्रक्रिया करण्यासाठी सोमवारी (२१ जुलै) रोजी पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाचे अधिकारी व महापालिका अधिकारी यांची संयुक्त बैठक घेण्यात येणार आहे. त्यानुसार तातडीने कारवाई करण्याच्या सूचना पालिका आयुक्तांनी दिल्या.

# मेथी, कोथिंबिरीच्या जुडीला केवळ 2 रुपये दर; पुरंदरच्या शेतकऱ्याना मोठा फटका

## योग्य दर मिळत नसल्याचे दिसून येते, त्यामुळे अनेक शेतकऱ्याना तोटा सहन करावा लागत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यात पुरंदर उपसा जलसिंचन योजना तसेच शेततळ्यांचे जाळे निर्माण झाले आहे.त्यामुळे शेतकरी फळबागांसह तरकारी भाजीपाल्याचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेत आहेत. त्यात मेथी, कोथिंबीर, शेपू, कांदापात, वाटाणा, कोबी, फ्लॉवर, टोमॅटो आदी पिकांचा समावेश आहे. आता या पिकांचे उत्पादन वाढले असले, तरी त्यांना योग्य दर मिळत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागत आहे.

सध्या तालुक्यातील शेतकऱ्यांना मेथी, कांदापात वगळता इतर भाजीपाला तीन-चार रुपये भावाने विकावा लागत आहे. फ्लॉवरला किलोला अवघा दहा रुपये असा नीचांकी दर मिळत आहे. कोबी, टोमॅटो अशा खर्चीक पिकालादेखील समाधानकारक दर मिळत नाही. यामुळे काढणीचा व वाहतूक खर्चही भागत नाही. परिणामी, अनेकदा शेतमाल फेकून द्यावा लागत असल्याचे परिसरातील शेतकऱ्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना पिकांवर सतत औषध फवारणी करावी लागते. त्यातून उत्पादन खर्च वाढतो. त्यातच सध्या शेतमालाला खूपच कमी बाजारभाव मिळत आहे. त्यामुळे मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असल्याचे परिसरातील शेतकरी सांगत आहेत. पुरंदर तालुक्यातील पिसर्वे गावचे शेतकरी सचिन कोलते यांनी ढुमेवाडी येथील बाजारात विक्रीसाठी कोथिंबीर आणली होती. त्यांना एका जुडीला अवघा दोन ते तीन रुपये बाजार मिळाला. यात काढणीचा खर्च वगळता शेतकऱ्यांच्या हातात काहीच शिल्लक राहिले नाही.



### शेतकरी आला मेटाकुटीस

» ढुमेवाडी येथील बाजार संध्याकाळी सहा वाजता सुरू होतो, सासवडचा बाजार सकाळी सहा वाजता सुरू होतो. त्यामुळे ढुमेवाडी येथे माल शिल्लक राहिल्यास सकाळी सासवडच्या बाजारात जायचे, अशी कसरत शेतकऱ्यांना करावी लागत आहे. अलीकडच्या काळात खते व बियाण्यांचे वाढलेले भाव आणी मिळणाऱ्या कमी दरामुळे शेतकरी मेटाकुटीस आला आहे.

### उत्पादन खर्चात वाढ

» गेल्या काही दिवसांपासून ढगाळ वातावरणामुळे पिकांना कीडरोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पिकांवर सतत औषध फवारणी करावी लागते. त्यातून उत्पादन खर्च वाढतो. त्यातच सध्या शेतमालाला खूपच कमी बाजारभाव मिळत आहे. त्यामुळे मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असल्याचे परिसरातील शेतकरी सांगत आहेत.